REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 10 | JULY - 2017



# विठ्ठलपंतांची तीर्थयात्रा – एक भौगोलिक अभ्यास

***प्रा.दादासाहेब मारकड***
*भूगोल विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,*
*राजगुरूनगर, ता. खेड जि.पुणे*

**सारांश –**

संत ज्ञानेश्वर महाराजांचे पिता विठ्ठलपंत कुलकर्णी यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक तीर्थयात्रा केल्या. लग्नापूर्वी आणि लग्नानंतरही त्यांची तीर्थयात्रा आणि वणवण संपली नाही. त्यांनी विवाहापूर्वी पैठणहून निघून द्वारका, पिंडारक, सुदामपुरी, प्रभास,सोमनाथ, त्र्यंबकेश्वर, भिमाशंकर, आळंदी, पंढरपूर, श्री शैल्यम, रामेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, काशी, अशी त्यांनी तीर्थयात्रा केली. त्याचाच अभ्यास याठिकाणी मांडला आहे.

**प्रस्तावना –**

विठ्ठलपंतांचे वडील विठ्ठलपंतांचे वडील गोविंदपंत हे नाथ संप्रदायाचे अनुग्रहीत होते. तरी पंढरपूरच्या विठ्ठलाचे परम भक्त होते. त्यामुळे त्यांनी आपल्या एकुलत्या एका मुलाचे नाव विठ्ठल ठेवले होते. गोविंदपंत आणि निराई यांना वृद्धापकाळात विठ्ठल हा मुलगा झाला होता. हा मुलगा गहिनीनाथांच्या कृपेनच झाला असावा अशी लोकश्रद्धा आहे. विठ्ठलपंतांचा जन्म नेमका कधी झाला याविषयी इतिहास काहीही सांगत नाही. त्यांचा जन्म शके ११६० ते ११७० या दरम्यान झाला असावा.

विठ्ठलपंत जन्माला आल्यापासूनच विरक्त होते. त्यांचे वैदिक पद्धतीचे शिक्षण आपेगाजवळील प्रख्यात अशा पैठण शहरात झाले असावे. पैठण हे त्या काळचे वैदिक विद्येचे केंद्र होते. नियमानुसार गुरूगृहीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्नातकाने (विद्यार्थ्याने) घरी येऊन गृहस्थाश्रम स्विकारायचा असतो. मात्र विठ्ठलपंतांनी वेदविद्येचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर घरी येवून लगेच गृहस्थाश्रम स्विकारला नाही. त्यांनी तीर्थयात्रेचा मानस गोविंदपंतांना बोलून दाखविला. त्यावर गोविंदपंतांनी अनिच्छेने संमती दिली. आणि विठ्ठलपंत तीर्थयात्रेला निघाले.

**उद्दिष्ट** – विठ्ठलपंतांच्या तीर्थयात्रेचा भौगोलिकदृष्ट्या आढावा घेणे.

**अभ्यासपद्धती** – विविध ग्रंथातून माहिती संकलित केली.

**विषय विवेचन –** विठ्ठलपंतांच्या तीर्थयात्रेविषयी काही वाद आहेत. नामदेव गाथेमध्ये संत नामदेव म्हणतात,

यावर विश्वनाथ शेटे म्हणतात, विठ्ठलपंतांबरोबर गोविंदपंत आणि निराईही तीर्थयात्रेला गेले.“ विठ्ठलपंत गोविंदपंत आणि निराई यांना घेऊन उत्तरेकडे द्वारका, पिंडारक, सुदामपुरी, प्रभास, सोमनाथ, करून दक्षिणमानसी त्र्यंबकेश्वरी आले.”[१] या विधानात विठ्ठलपंतांबरोबर माता पिता दोघे गेले असा उल्लेख आहे. मात्र डॉ. शंकर अभ्यंकर, डॉ. शं.दा पेंडसे यासारख्या विछ्वानांच्या मते विठ्ठलपंत एकटेच तीर्थयात्रेला गेले होते.

तीर्थयात्रेचा मार्ग सांगताना डॉ. शं.दा. पेंडसे यांनी संपूर्ण भारतालाच प्रदक्षिणा घातलेली आहे. त्यांच्या मते विठ्ठलपंत तीर्थयात्रा करत पुढील ठिकाणी गेले असावेत,[२] " आपेगांव – नीरा भिवरा संगम – गोदावरी – नाशिक पंचवटी – घृष्णेश्वर – ओंकार मांधाता – द्वारका – रैवतक – ढवळपुर – मुचकुंद गुंफा – प्रभास – सोरटी सोमनाथ – सिद्धपूर – पुष्कर – कुरूक्षेत्र – ठाणेश्वर – यमुनातीर – इंद्रप्रस्थ – हस्तिनापूर – अंतर्वेदी – मायापूर – हरिद्वार – हृषिकेश – देवप्रयाग – केदार – कैलास – बद्रीनारायण – मानसरोवर – गंडकी – अयोध्या – नैमिषारण्य – मधुपुरी – गोकुळ वृंदावन – कालियाडोह – गौतमेश्वर – मिथिला – उज्जैन – प्रयाग – काशी – गया – गंगासागर – जगन्नाथपुरी – गोदावरी सागरसंगम – वरदराज – अरूणाचल – चिदंबरम – विष्णूकांची – सेतू रामेश्वर – कन्याकुमारी – अनंतशयन – दक्षिणकाशी – गोकर्ण महाबळेश्वर – हाटकेश्वर – कोल्हापूर – कृष्णा वेण्णा संगम – महाबळेश्वर – पंढरपूर – आळंदी.

पेंडसेंनी थापा मारल्या आहेत. तसेच त्यांचा मार्गही भौगोलिक दृष्ट्या अगदी वेडावाकडा आहे. यातील काही ठिकाणी तर विठ्ठलपंत उभ्या आयुष्यात गेले नाहीत.

विठ्ठलपंत कोणकोणत्या ठिकाणी तीर्थयात्रा करून आले याविषयी वादच आहेत. डॉ. शंकर अभ्यंकर यांच्या मते विठ्ठलपंत पुढील मार्गक्रमणा करीत आळंदीत आले असावेत[३]


आपेगांव – द्वारका – सुदामपुरी – भालुकातीर्थ – प्रभासलिंग – सोरटी सोमनाथ – मुचकुंद गुंफा – सप्तशृंग गुंफा – अरूणावती – प्राची – त्रिवेणी संगम – नाशिक – कपालेश्वर – त्र्यंबकेश्वर – कुशावर्त – ब्रम्हगिरी – भिमाशंकर – आळंदी. विठ्ठलपंत आळंदी येथे आल्यानंतर त्यांनी लग्न केले. त्यानंतर ते दक्षिणेकडील तीर्थांना गेले. दक्षिणेकडे ते पंढरपूर – श्री शैल – व्यंकटाद्री – अभोळ – अरूणाचल – चिदंबरम – कावेरी – रामेश्वर – गोकर्ण महाबळेश्वर – हाटकेश्वर – कोल्हापूर – पंचगंगा – क-हाड – माहुली – आळंदी.

लग्नापुर्वी विठ्ठलपंत तीर्थयात्रेसाठी जेथे जेथे गेले त्याचे वर्णन संत नामदेवांनी केलेले आहे. मात्र तेवढ्याच तीर्थांना विठ्ठलपंत गेले असतील असे नव्हे. असे काही अभ्यासकांना वाटते. रा.ना.सराफ हे त्यापैकीच एक अभ्यासक आहेत. त्यांच्या मते," तीर्थयात्रेचे वर्णन नामदेवांनी केले, त्यात वर्णिलेल्या तीर्थांनाच विठ्ठलपंत गेले असे वाटत नाही. तीर्थयात्रेच्या निमित्ताने निघालेले विठ्ठलपंत सारी तीर्थे पाहिल्याशिवाय राहतील हे संभवनीय वाटत नाही. मुख्य मुख्य तीर्थांचा उल्लेख करून बाकीच्यांचा उल्लेख विस्तारभयास्तव त्यांनी टाळला असावा. तसेच ज्या क्रमाने या तीर्थांची नावे नामदेवांनी दिली ती विठ्ठलपंतांच्या यात्रेच्या अनुक्रमानेच होती की काय हे समजावयाला अन्य मार्ग नाही. संत नामदेव सांगतात त्याप्रमाणे विठ्ठलपंतांनी द्वारका, पिंडारक, सुदामपुरी, मूळमाधव, भालुकातीर्थ, प्रभास, मुचकुंद गुंफा, सप्तशृंगी, त्र्यंबकेश्वर, भिमाशंकर, इत्यादि क्षेत्रांना भेट दिली. यात काशी क्षेत्राचा उल्लेख नाही."[४]

वरील सा-या माहितीवरून आपण काही सर्वसामान्या निष्कर्ष काढू शकतो. विठ्ठलपंत हे तीर्थयात्रेला गेले याविषयी सर्वांचे एकमत आहे. मात्र विठ्ठलपंत आपल्या बरोबर वृद्ध मातापित्यांना घेऊन तीर्थयात्रेला जातील हे संभवनीय वाटत नाही. त्यामुळे विठ्ठलपंतांबरोबर त्यांचे मातापिता तीर्थयात्रेला गेले हे जे विश्वनाथ शेटे यांनी मत दिले आहे ते चुकीचे आहे. आता विठ्ठलपंत तीर्थयात्रेला गेले ते सर्व भारतालाच प्रदक्षिणा घालून आले हे जे शं.दा.पेंडसे यांचे मत आहे त्या शुद्ध थापा आहेत. तो वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. संत नामदेवांनीही इतक्या तीर्थांची यादी दिलेली नाही. मुख्य मुख्य तीर्थे देऊन बाकीची तीर्थे विस्तारभयास्तव यांनी टाळली असावीत हे सराफ यांचे मत आहे त्यास सराफांच्या विधानाशिवाय दुसरा पुरावा नाही. त्यांनी दिलेल्या माहिती नुसार ते काशी या तीर्थक्षेत्राचे नाव नामदेवांनी दिलेले नाही. पण विठ्ठलपंत काशीला गेल्याशिवाय कसे राहतील हे सराफ यांना वाटते. मग काशीचे नाव नामदेवांनी का दिले नाही? मुचकुंद गुंफेसारख्या सामान्य तीर्थाचे नरव दिलेले आहे आणि काशीचे नाही. काशी हे असामान्य ठिकाण मुख्य क्षेत्रात येत नाही काय? असे कसे म्हणावे? त्यामुळे नामदेवांनी जी तीर्थक्षेत्रांची यादी दिलेली आहे. तीच तीर्थे विठ्ठलपंतांनी केली असावीत तो मार्ग असा –

आपेगांव – पैठण – द्वारका – सुदामनगरी – भालुकातीर्थ – प्रभासलिंग – सोरटी सोमनाथ – मुचकुंद गुंफा – सप्तशृंग पर्वत – नाशिक – त्र्यंबकेश्वर – भिमाशंकर – आळंदी याच मार्गाने विठ्ठलपंत आळंदीला आले असावेत. हा मार्ग सोयिस्कर, पश्चिमेकडील तीर्थक्षेत्रे जोडणारा, साधारणतः योग्य अनुक्रम असणारा वाटतो. म्हणूनच पेंडसेंचा अनुक्रम व्यवस्थित नसणारा, संपूर्ण भारताची तीर्थयात्रा करणारा हा विठ्ठलपंतांचा मार्ग चुकीचा वाटतो.

विठ्ठलपंतांची महाराष्ट्रातील तीर्थयात्रा




विठ्ठलपंत तीर्थयात्रा करीत आळंदी येथे आले याला कारणे आहेत. कारण आळंदी हे जुनाट शिवक्षेत्र होते. ते एक तीर्थक्षेत्रच होते. आळंदी येथे आल्यावर त्यांनी इंद्रायणीत स्नान केले. आणि ते सिद्धेश्वराच्या दर्शनाला गेले. तेथे दर्शन घेत असताना वाटेत सिद्धोपंत भेटले. सिद्धोपंतांची कन्या मीनाक्षी उर्फ रूक्मिणी हिचा विठ्ठलपंताशी विवाह झाला. लग्नानंतरही विठ्ठलपंत तीर्थयात्रा करण्यासाठी दक्षिणेकडे निघाले. ज्ञानेश्वर चरित्रकार विश्वनाथ शेटे म्हणतात,

" त्यानंतर गोविंदपंत, निराई विठ्ठलपंत रूक्मिणी, व सिद्धोपंत ही सर्व मंडळी, पंढरीस पांडुरंग दर्शनास गेली. नंतर ती श्री शैल्यम येथे गेली."[५]

परंतु हे म्हणणे पटण्यासारखे नाही.कारण ही सर्व मंडळी बरोबर घेवून विठ्ठलपंत तीर्थयात्रा करणे शक्य नव्हते. त्यांच्या स्वभाव प्रवृत्तीत हे बसत नाही. ते एकटेच तीर्थयात्रेसाठी दक्षिणेकडे गेले. ते दक्षिणेस तीर्थयात्रा करण्यास जाण्याचे कारण हे असावे की सुरूवातीलाच ते उततरेकडील तीर्थयात्रा करून आलेले होते. दक्षिणेकडील तीर्थयात्रा पूर्ण करण्याचा त्यांचा मानस होता. तीर्थयात्रा अर्ध्यातच राहू नये यासाठी विठ्ठलपंतांनी लग्नानंतर दक्षिणेकडे तीर्थयात्रा केली. डॉ. शंकर अभ्यंकर यांच्या मते त्यांनी लग्नानंतर पुढील ठिकाणी तीर्थयात्रा केली.

आळंदी – पंढरपूर – श्री शैल्यम – व्यंकटाद्री – अभोळ – अरूणाचल – चिदंबरम – कावेरी – रामेश्वर – गोकर्ण महाबळेश्वर – हाटकेश्वर – कोल्हापूर – पंचगंगा – कराड – माहुलीली – आळंदी.

तीर्थयात्रा करून विठ्ठलपंत पुन्हा आळंदीला आले. तेथे आल्यानंतर आपली नवपरिणत वधू रूक्मिणी, सासूसासरे यांना घेवून ते आपेगांव येथे गेले. तेथे ते आपले वृद्ध मातापिता गोविंदपंत आणि निराई यांना भेटले. त्यांनतर विठ्ठ्यठलपंताचे सासू सासरे आळंदीला परतले. त्यानंतर काही दिवसांनी वृद्ध गोविंदपंत आणि निराई निजधामास गेले. विठ्ठलपंत आणि रूक्मिणी दोघेच आपेगांव येथे राहू लागले. हे पाहून सिद्धोपंतांनी विठ्ठलपंत आणि रूक्मिणी यांना आळंदीस आणले. तेथे विठ्ठलपंतांनी आठ वर्षे रूक्मिणीबरोबर संसार केला. याविषयी ज्ञानेश्वर चरित्रकार रा.ना.सराफ म्हणतात,

" लग्न करावे संततीकरिता, आणि ती होण्यासाठी पुष्कळ काळ विठ्ठलपंतांनी दिला. या सात आठ वर्षात संतती होत नाही असे दिसून आल्यावर पुढे संतती होईल अशी आशा बाळगणे विठ्ठलपंतासारख्या प्रामाणिक माणसाला शक्य नव्हते."

यावरून असे लक्षात येते की विठ्ठलपंतांनी लग्न झाल्यानंतर लगेच संन्यास घेतला नव्हता. त्यांनी आठ वर्षे रूक्मिणीबरोबर संसार केला होता. आठ वर्षे संसार करूनही विठ्ठलपंतांना संतती झाली नाही म्हणून त्यांनी संन्यास घेण्याचा विचार केला. विठ्ठलपंत संन्यास घेण्यासाठी पत्नीला अनुमती मागू लागले. परंतु पत्नीने अनेक दिवस अनुमती दिली नाही. परंतु तिने एकदा त्राग्याने जा जा म्हणून सांगितले. तीच पडत्या फळाची आशा शिरसावंद्य मानून विठ्ठलपंत काशीला निघून गेले. विश्वनाथ शेटे म्हणतात,

'' पत्नीला आणि सासुसास-यांना दुःखसागरात लोटून विठ्ठलपंतांनी तडक काशीची वाट धरली.''

काशीला गेल्यानंतर विठ्ठलपंतांनी श्रीपादस्वामी या साधूकडून संन्यास घेतला. त्यांनी चैतन्य असे नाव धारण केले. ते तेथेच राहू लागले.

इकडे विठ्ठलपंत निघून गेल्यामुळे सिद्धोपंत, रूक्मिणी, व माता हैराण झाले. त्यांनी विठ्ठलपंताचा सर्वत्र शोध घेतला. मात्र त्यांना विठ्ठलपंताचा तपास लागला नाही. रूक्मिणीने पतीसाठी पिंपळाला लक्ष प्रदक्षिणा करण्याचे अनुष्ठान सुरू केले.

'' काही काळानंतर विठृठलपंतांचे गुरू श्रीपादस्वामी यांनी रामेश्वराचे दर्शन घेण्यासाठी तीर्थयात्रा करण्याची इच्छा झाली. ते काशीहून दक्षिणेकडे निघाले. काशी रामेश्वराच्या हमरस्त्यावर आळंदी नव्हते आणि नाही.

आळंदी येथे आल्यावर श्रीपादस्वामी सिद्धेश्वराच्या मंदिरात उतरले. तेथे रूक्मिणी पिंपळाला प्रदक्षिणा घालत होती. प्रदक्षिणा संपवल्यानंतर तिने श्रीपाद स्वामींना नमस्कार केला. त्यासरशी त्यांनी पुत्रवती भव असा आशीर्वाद दिला. या आशीर्वादाने रूक्मिणी चपापली. तिने सर्व वृत्तांत श्रीपाद स्वामींना सांगून आशीर्वाद सफल कसा होणार असा प्रश्न केला. त्यानंतर श्रीपादस्वामी विठ्ठलपंतांच्या घरी गेले.तेथे त्यांनी विठ्ठलपंतांच्या शरिरावरील खाणाखुणा विचारून घेतल्या. असा मनुष्य प्रवासात मिळाल्यास त्यास तुमच्याकडे पाठवून देतो.असे आश्वासन देऊन श्रीपाद स्वामी निघून गेले.

श्रीपादस्वामी काशीला आल्यानंतर त्यांनी चैतन्य या शिष्याला बोलावून घेतले. सिद्धोपंत आणि रूक्मिणी यांनी सांगितलेल्या खाणाखुणा त्यांनी चैतन्याच्या अंगावर तपासून पाहिल्या. त्यानंतर हाच विठृठलपंत अशी त्यांची खात्री झाली. त्यांनी विठृठलपंताला सर्व परिस्थिती समजावून सांगून आळंदीस पाठविले. गुरूंच्या सांगण्यावरून विठ्ठलपंत पुन्हा आळंदीत येऊन गृहस्थाश्रमी बनले.

संन्यास घेतलेला एक संन्याशी संन्यासाश्रम सोडून गृहस्थाश्रमी बनतो ही गोष्ट आळंदीतील ब्राम्हणांना खटकली. त्यांनी विठ्ठलपंतासह सिद्धोपंतांच्या कुटुंबावरच बहिष्कार टाकला. त्यांच्यावर ग्रामण्य लादले. म्हणजे त्यांना वाळीत टाकले. ह्या सर्व प्रकाराने व्यथित होऊन सिद्धोपंत व त्यांची पत्नी परलोकवासी झाले. त्यानंतर ग्रामस्थांनी विठ्ठलपंताचा खूपच छळ केला. विठ्ठलपंत रूक्मिणीसह आळंदीच्या पश्चिमेस इंद्रायणीकाठी असणा-या सिद्धबेटावर राहण्यास गेले.तेथे विठ्ठलपंत आणि रूक्मिणी यांना तीन मुले व एक मुलगी झाली. काहींच्या मते विठृठलपंतांना ही चार मुले आपेगांवात झाली. पण हा खोडसाळपणा आहे. त्यामुळे त्याच्याशी काही कर्तव्य नाही.

ही चार मुले मोठी झाल्यानंतर थौरला निवृत्ती मौजीबंधनाच्या वयाचा झाला. त्यामुळे विठ्ठलपंत मौजीबंधनास अनुमती घेण्यास आळंदीतील ब्रम्हवृंदांकडे गेले. ब्राम्हणांनी मौजीबंधनास साफ नकार दिला व शुद्धीपत्र आणण्यासाठी पैठण येथे जाण्यास सुचविले. हा निर्णय ऐकून विठठलपंत निराश होऊन घरी परतले.

यानंतर विठ्ठलपंतांनी कुटुंबासहवर्तमान ब्रम्हगिरीची प्रदक्षिणा करण्याचे ठरविले. या संदर्भात ज्ञानेश्वर चरित्रकार रा.ना. सराफ म्हणतात, '' नामदेवांच्या आदित नसलेली पण ज्ञानेश्वराच्या चरित्रातील एक महत्वपूर्ण घटना दंतकथेने, परंपरेने प्रचलित आहे.''[१६] ही घटना अशी, '' आळंदीकरांनी ग्रामण्य लादल्यामुळे विठ्ठलपंत व त्यांचे कुटुंबिय खिन्न झाले होते. तशात विठ्ठलपंतांनाही आपण काहीतरी चूकच केली आहे अशी टोचणी वाटत होती. या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून विठृठलपंतांनी त्र्यंबकेश्वर जवळील ब्रम्हगिरी डोंगराला प्रदक्षिणा घालण्याचे ठरविले. त्यानुसार विठ्ठलपंत सर्व कुटुंबाला घेवून ब्रम्हगिरीवर प्रदक्षिणा करण्यास गेले. तेथे प्रदक्षिणा घालत असताना वाघाची डरकाळी ऐकू आली. वाघाच्या भितीने सर्वजन इतस्ततः विखुरले गेले. त्यात थोरला निवृत्तीनाथ एका गुहेत गेला त्या गुहेत गहिनीनाथ तपश्चर्या करीत बसले होते. गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना जवळ बोलावून घेतले. त्यास अनुग्रह दिला. तेथेच त्यास दहापंधरा दिसव ठेवून घेतले. त्यानंतर त्यांना घरी पाठवून दिले.

इकडे निवृत्तीनाथ गेल्यानंतर प्रदक्षिणा अर्ध्यावरच सोडून विठ्ठलपंत आळंदीत आले होते. त्यांनी सात आठ दिवस निवृत्तीची शोधाशोध केली. त्यानंतर निवृत्ती घरी आल्याचे पाहून त्यांना आनंद झाला.

विठ्ठलपंतांना आपल्या मुलांचे मौजीबंधन केल्याशिवाय चैनच पडणार नव्हती. तसेच आळंदीच्या ब्रम्हसभेने त्यांना पैठणला जाण्याचा सल्ला दिलेला होता. त्यानुसार विठ्ठलपंत आपल्या कुटूंबियांना आळंदीत ठेवून पैठण येथे गेले. तेथील ब्रम्हसभेने त्यांना देहांत प्रायश्चिताची शिक्षा सुनावली. विठ्ठलपंत निराश होऊन पुन्हा आळंदीला आले. त्यांनी कोवळी चार मुले मागे ठेवून पत्नीसह इंद्रायणीत जलसमाधी घेतली. काहींच्या मते ते काशीला गेले आणि गंगेत देह विसर्जन केला काहींच्या मते प्रयाग येथे देहत्याग केला. काही म्हणतात बदरीनाथ येथे देह ठेवला. ते काहीही असो. शेवटी विठ्ठलपंत आणि रूक्मिणी यांनी देहान्त प्रायश्चित्त घेतले.

## निष्कर्ष –

वरील विवेचनाच्या आधारे आपणास विठ्ठलपंत त्यांच्या आयुष्यात कोठे फिरले हे समजते. त्यांच्या जीवनाची फरफटच झाली. त्यांचा प्रवास पुढीलप्रमाणे झाला. आपेगांव – पैठण – द्वारका – सुदामपुरी – भालुकातीर्थ – प्रभासलिंग – सोरटी सोमनाथ

– मुचकुंद गुंफा – सप्तशृंग गुंफा – अरूणावती – प्राची – त्रिवेणी संगम – नाशिक – कपालेश्वर – त्र्यंबकेश्वर – कुशावर्त – ब्रम्हगिरी – भिमाशंकर – आळंदी – पंढरपूर – श्री शैल – व्यंकटाद्री – अभोळ – अरूणाचल – चिदंबरम – कावेरी – रामेश्वर – गोकर्ण महाबळेश्वर – हाटकेश्वर – कोल्हापूर – पंचगंगा – क-हाड – माहुली – आळंदी – आपेगांव – आळंदी – काशी – आळंदी – त्र्यंबकेश्वर – ब्रम्हगिरी – आळंदी – पैठण – आळंदी – प्रयाग येथे देहत्याग.

**संदर्भग्रंथ –**


१. विश्वनाथ शेटे – संत ज्ञानेश्वर चरित्र, कार्य व तत्वज्ञान पृ.८, संत ज्ञानेश्वर विद्यापीठ आळंदी १६७६
२. डॉ. शं.दा.पेंडसे – ज्ञानदेव आणि नामदेव
३. डॉ.शंकर अभ्यंकर – भारतीय संत, भक्तीकोश खंड २ पृ ५३६ आदित्य प्रतिष्ठान पुणे २००२
४. रा.ना.सराफ – श्री ज्ञानेश्वर चरित्र पृ.२१,२२ ॲकेडमी ऑफ कं.फि.ॲ.रि. बेळगांव १६७५
५. विश्वनाथ शेटे – तत्रैव पृ.१७